# हिंदु धर्माचें सर्वसंग्राहक स्वरूप

न्या. मू. माधवरावजी रानडे
यांचें व्याख्यान

294
Ran
860

[ ...मुद्रणालय, पुणें ४ ]

१९३७

165

294
शि. प्र. मंडळी प्र. म.
860

द्रित )

294
शि. प्र. मंडळी प्र. म.
860

## प्रस्तावना.

डॉ. पेन्टीकास्ट ह्या प्रसिद्ध मिशनरी वक्त्यांनीं येथील आनंदोद्भव नाटकगृहांत दोन आठवडे ख्रिस्ती धर्माचे प्रसाराकरितां व्याख्यानें दिलीं. त्यांस सरतेशेवटीं रा. ब. रानडे यांनीं उत्तरादाखल इंग्रजींत एक भाषण केलें. रा.ब. रानडे ह्यांचें भाषण इतकें मार्मिक व सुरस, विचारसरणी इतकी कुशल, व इतिहास व धर्म यांच्या माहितीनें तें इतकें भरलें आहे कीं, तें मराठी वाचकांस सादर करणें फारच इष्ट वाटलें, धर्मसंबंधीं चर्चेत अनादि मतभेद आहेच. तो ह्या व्याख्यानानें नाहींसा होईल असें नाहीं. तेव्हां वर सांगितलेल्या गुणांचें हें व्याख्यान चांगलें दर्शक आहे असें दाखविण्याचाच ह्या भाषांतराचा मुख्य हेतु आहे. भाषांतरांत ठिकठिकाणीं टिपा दिल्या आहेत, त्यांची जबाबदारी भाषण करणारावर नाहीं. भाषांतरकर्त्यानें त्या टिपा रा. ब. चें भाषण विशद व्हावें म्हणून दिल्या आहेत.

ता. १५ आक्टोबर १९११.

भाषांतरकर्ता

# हिंदु धर्माचें सर्वसंग्राहक स्वरूप

## न्या. मू. माधवरावजी रानडे यांचें व्याख्यान.

## डॉ. पेन्टीकास्ट यांच्या आक्षेपांस उत्तर.

आपले प्रसिद्ध व सन्माननीय मित्र डॉ. पेन्टीकास्ट यांचीं ज्ञान व उपदेशपर भाषणें श्रवण करण्यास आपण गेल्या आठवड्यांत पुष्कळ वेळां येथें जमलों. त्या व्याख्यान-मालेची आज समाप्ति आहे. या गृहस्थांचे पायाशीं बसून त्यांच्या अस्खलित आणि भाविक वाणींतून स्रवलेलें ज्ञानामृत आपणांस प्राशन करितां आलें, हें आपलें अपूर्व भाग्यच समजलें पाहिजे. इतके दिवस येवढा मोठा समाज येथें जमत गेला व ह्या समाजाची आस्था दररोज वृद्धिंगतच होत गेली. या दोन गोष्टींशिवाय, डॉ. पेन्टीकास्ट यांनीं सत्यप्रसाराकरितां जे परिश्रम केले ते आम्हांस

ग्रा ५१९८

मोलाहून किती आगळे भासतात, हें दाखविण्यास आम्हांजवळ दुसरें साधन नाहीं. पुण्याचे लोकांस संतुष्ट करणें नेहमीं फार दुरापास्त असतें. अशा प्रकारचे पूर्वी घडून आलेले जे प्रसंग मला आठवतात, त्यांचे अनुभवावरून या शहरांतील लोक ख्रिस्ती उपदेशकाचें स्वधर्मप्रशंसापर भाषण लक्षपूर्वक व शांतपणें ऐकतील असें मला वाटलेंच नव्हतें; परंतु आजचा हा जो सुदिन दृष्टीस पडला. याचें खरें इंगित म्हटलें म्हणजे, डॉ. पेन्टीकास्ट यांची आपल्या श्रोत्यांचीं मनें आकर्षून घेण्याची शैली, अपूर्व वक्तृत्व, शुद्ध हेतू व विशेषेंकरून समानवृत्ति व सरळ विचार हें होय. ज्या गोष्टींत सर्व धर्मांचे लोकांची एकवाक्यता आहे, त्या गोष्टी शोधकबुद्धीनें निवडून काढून, त्या मनांत ठसतील अशा रीतीनें श्रोत्यांस निवेदन करून व सर्वत्रांत सर्वसाधारणपणें वसणाऱ्या उन्नत वृत्तीस त्यांच्या साह्यानें जागृत करून, वक्त्यानें ज्या वेळीं उपदेश केला त्या वेळींच त्याची सरलविचारतत्प-

रता उत्तम रीतीनें उद्यास आली. समान व सरळ वृत्ति, हा गुण जगतांत इतका दुर्मिळ व म्हणून इतका मौल्यवान आहे कीं, तो वक्त्याचे भाषणांत प्रकट होतांच श्रोत्यांचीं मनें तल्लीन झालीं आणि पहिलेच दिवशीं त्यांच्या ठिकाणीं ख्रिस्तीधर्मोपदेशकाविषयीं वसणारा अप्रेमाभाव नष्ट झाला; साहेब मजकुरांचा भाषणौघ, त्यांच्या समानवृत्तीनें त्यांस घालून दिलेल्या मर्यादेबाहेर एकदोनदां गेला खरा. परंतु ज्या परमेश्वराची मी तुम्हांस ओळख करून देण्यास आलों आहें व ज्यास तुम्हींही एक देवालय अर्पण केलें आहे, त्या देवास भजा, अशी एकदां अपास्सल् पालनें अथिनिअन लोकांस उपदेश करून त्यांची विनवणी केली; ह्या प्रसंगीं त्या साधूनें जो भाषणपद्धतीचा कित्ता घालून दिला आहे, तोच वळविला असतां श्रोत्यांचीं मनें परमेश्वराकडे वळवितां येतात, अन्य मार्गानें येत नाहींत, हा सुविचार डॉ. पेन्टीकास्ट यानीं मनांत आणून, सदर एकदोन स्थळें शिवाय करून, बाकीच्या

एकंदर भाषणांत, आमच्या धर्मावर कटु शब्दांचा प्रहार करून आमचीं मनें न दुखविण्याविषयीं ते सावध राहिले.

डॉ. पेन्टीकास्ट यानीं दोन आठवडे आपणाकरितां जे जीवापाड श्रम केले, त्यांजबद्दल नेहमींच्या शिष्टाचाराप्रमाणें त्यांचे आपण उपकार मानिले, म्हणजे आपण त्यांचे उतराई झालों असें नाहीं. आपणां सर्वांचीं मनें ह्या उपकारांखालीं चूर झालीं आहेत, हें खरें. तथापि जसे आपण उदीम व्यापाराकरितां अगर करमणुकीकरितां एकत्र जमतों व काम झालें म्हणजे एकमेकांस रामराम ठोकून आपल्या वाटेस लागतों, त्याप्रमाणेंच पुढें कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं असें समजून डॉ. पेन्टीकास्ट यांस आपण असें जाऊं दिलें, तर त्यांनीं केलेल्या उपकारांबद्दल आपण योग्य कृतज्ञता दाखविली असें होणार नाहीं. आपण केलेल्या उपदेशाचें याहूनही विशेष प्रकारचें एकादें फल दृष्टीस पडावें अशी त्यांची अपेक्षा असलीच पाहिजे; तशांत काल रोजीं त्यांनीं मोठ्या

कळकळीनें जे आपणांस प्रश्न विचारिले आहेत त्यांचीं जर आपण निर्मूल अंतःकरणानें प्रेमपुरस्सर उत्तरें दिलीं नाहींत, तर ज्या ठिकाणीं आपण वास करितों व ज्या परंपरेचा आपण अभिमान बाळगितों, त्या स्थानाचें व त्या परंपरेचें ब्रीद संभाळण्यास आपण पात्र नाहीं असें लोक समजतील. हाच विचार मनांत आणून माझ्यासारख्या गरिब मनुष्याचें काय म्हणणें आहे, तें ऐकण्याची मी तुम्हांस घटकाभर तसदी देत आहें. ह्याच विचारानें तुम्हांपुढें उभें राहण्याचें साहस करण्याची मला उमेद आली आहे. कारण हा विचार माझे मनांत आला नसता, तर ज्या व्यासपीठावरून अंतःकरणास स्फुरण चढविणाऱ्या शब्दांचा स्त्राव होऊन आपण इतके दिवस न्हाऊन माखून निघालों व ज्या व्यासपीठावर निर्माण झालेल्या गोड व भाविक विचारसरणीनें आपलीं मनें हालवून सोडलीं, त्या व्यासपिठावर मी उभाच राहिलों नसतों.

दाखल अंक 860
बोधांक २९४/६ Rem
23-1-92
किंमत तारीख

सभ्य गृहस्थही! आज मित्तीस हिंदुस्थानांतील वस्तुस्थितीचें असें कांहीं स्वरूप बनलें आहे कीं, आजच्या सारख्या ह्या समाजाचें, बैबलांतील थोरल्या पेन्टीकास्ट* नामक समाजाशीं बरेंच साम्य होतें. त्या पेन्टीकास्ट समाजांत पार्थियन, मीडीज, मेसापोटेमियन, फ्रिजियन, इजिपशियन, सिरियन, ज्यू, रोमन व ग्रिक, या लोकांच्या व ख्रिस्तो साधूंच्या गांठी पडल्या व तेथें जमलेल्या प्रत्येक देशाच्या, जातीच्या, वर्णाच्या व धर्माच्या लोकांस, ज्यांच्या त्यांच्या स्वभा-

---

* इ० सन ३३ चे वर्षी पेंटीकास्ट नांवाचे सणाचे दिवशीं जरूसिलेम येथें नाना देशांचे नाना भाषा बोलणारे नाना मतांचे लोकांस ज्यांच्या त्यांच्या भाषेंत अकरा प्रेषितसाधूंनीं उपदेश केला; ह्या प्रसंगाचा वक्त्यानें येथें उल्लेख केला आहे. पहा नवा करार आक्ट २. पेन्टीकास्ट सणाची उत्पात्ति पाहणें झाल्यास ती लेव्हिटिकस, अ. २३ पं. १५ त सांपडेल.

कै. भ. म. स. वा. ग्रंथालय

षेंत ख्रिस्ती साधूंनीं ख्रिस्ती धर्माचा उपदेश केला. हल्लींच्या समाजासंबंधानें पाहतां, भाषावैचित्र्यामुळें येणारी अडचण, आपणां सर्वांस ईश्वरकृपेनें इंग्रजी भाषा अवगत असल्यानें दूर झाली आहे. तरी पेन्टीकास्ट समाजांत मतवैचित्र्यामुळें उद्भवलेली अडचण ह्या समाजासही आहे; म्हणून प्राचीन काळीं सत्यप्रसाराकरितां ख्रिस्ती उपदेशकांची जशी जरूरी पडली, तशी ह्या काळींही आहे. जो प्रकार कोणच्याही देशांत कधीं दृष्टीस पडला नाहीं, तो हिंदुस्थानांत दृष्टीस पडत आहे. हा देश सर्व धर्मांचें माहेरघर होऊन राहिलें आहे व येथें सर्व धर्मांचे लोक एके ठिकाणीं नांदून, आपणां सर्वांचा जो परमेश्वर त्याची आराधना करीत आहेत, हा कांहीं 'काकतालीय' न्याय नाहीं. हा योग घडवून आणण्यांत परमेश्वराचें अंग आहे असें प्राचीन काळीं जसें स्पष्ट दिसून आलें तसेंच आतांहि दिसत आहे. ज्यू लोकांच्या एका प्रकारच्या विशेष अवस्थेमुळें ते परमेश्वराचे लाडके लोक होऊन राहिले.

यांच्या व आमच्या व्यवहारावस्थांमध्यें चांगलें सादृश्य दृष्टीस पडतें; अथवा ज्यू लोकांची आपण ही एक बडी मोठी आवृत्तीच आहोंत असें म्हटलें असतां चालेल. ज्यू लोकांसारखे आम्हीही ईश्वराचे कृपेंतील लोक आहोंत; आम्हीच सर्व धर्मांचें मूलबीज आहोंत; राज्यकारस्थान अथवा व्यवहार—व्यापार यांत निष्णात असा महापुरुष आमच्यांत निर्माण झाला नाहीं. ज्यू लोकांसारखे आम्हीही राजसत्ता-सुखास सदैव अंतरलों आहोंत. परकी-लोकांनीं आम्हांवर आपली तलवार गाजविली आहे. पारतंत्र्याच्या लाटा आम्हांवर कोसळून गेल्या आहेत. ख्रिस्ताचा जन्म होण्यापूर्वीं परमेश्वरानें जे ज्यू लोकांस शाप † दिले आहेत, त्याचप्रमाणें आम्हां-

---

† ख्रिस्ताचे जन्मापूर्वीं ज्यू लोकांस त्यांच्या आज्ञाभंगामुळें बरेच वेळां परमेश्वरानें शाप दिले आहेत, व त्यामुळें त्यांस पारतंत्र्य, कलह, युद्धें वगैरे संकटें भोगावीं लागलीं, ह्याचा जुन्या करारांत बरेच

सही हजारों वर्षांपूर्वी शाप मिळाले आहेत. ज्यू लोकांसारखे आम्हीही संस्कार, जपजाप, होमहवनें व कर्मे यांत निमग्न झालों आहोंत. ज्यू लोकांसारखा आम्हांतही विहित व वंशपरंपरागत भिक्षुक वर्ग आहे. त्यांच्या भिक्षुकासारखे आमच्यांतही स्नानें करणारे, देह शुचिर्भूत राखणारे, साधुवृत्ति धारण करणारे, उपासतापास करणारे व प्रायश्चित्तांनीं शुद्ध होणारे भिक्षुक आहेत. ज्यू लोकांसारिखे आम्हीही दुसऱ्यांस आमच्यांत घेत नाहीं व प्राण गेला तरी आम्ही स्वधर्माचा त्याग करीत नाहीं. परंतु परमेश्वरदयेनें ज्यू लोकांसारिखे आम्ही परधर्मद्वेष्टे अगर बलात्कारानें दुसऱ्यावर आपला धर्म लादणारे नाहीं. आमच्या सर्व इतिहासांत धार्मिक वृत्तीवांचून आमचें अन्य ब्रीद् आढळणार नाहीं. आमचीं धर्मशास्त्रें आहेत. आमचे जुने व नवीन

---

ठिकाणीं उल्लेख आहे. एहा. जजेस ६; १०; जेरिमहा. ६, १२, १३, १६; होसीआ; ४, ५, ९.

करार आहेत. आमच्या श्रुति आहेत, स्मृति आहेत, उपनिषदें आहेत. आम्हांवर बुद्ध धर्माचा प्रकाश पडून आमचा कर्म-मार्ग लोपून गेला आहे. अलीकडे वैष्णव व शैवपंथाचा उदय होऊन त्यांनीं ईश्वर-चरणापासून ढळलेलीं आमचीं मनें ताळ्या-वर आणून तीं फिरून त्या चरणाचे ठिकाणीं जडविली आहेत. आमची सर्व धर्मपरंपरा अद्वैतवादी आहे असें डॉ. पेन्टीकास्ट यांचे म्हणण्याचा झोंक दिसला परंतु वस्तुतः एका अध्यात्मपंथांतील विद्वान लोकांचे बाहेर अद्वैतमताचा* आमच्यांत फारसा प्रसार झाला नाहीं. आचारविचारदृष्ट्या आम्ही निव्वळ द्वैत-वादी आहोंत. परमेश्वर आणि मनुष्य-

---

*अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान ।
गोड हे चरण सेवा तुझी ।
करुनी उचित देईं हेंचि दान ।
आवडे कीर्तन नाम तुझें ।

—तुकाराम

जनक आणि जन्य, अनंत आणि नियतात्मा यांत आम्ही द्वैतभावच समजतों.

दीडशें वर्षांपूर्वी पृथ्वीवर दोन धर्मक्षेत्रें दृष्टीस पडत होतीं. हीं दोन्ही क्षेत्रें‡ स्वतंत्र व अलग असून त्यांचें एकमेकांशीं दळणवळण नसे. भरतखंडाचा सर्व पूर्वभाग हें एक क्षेत्र होय. पृथ्वीवरील एकंदर मनुष्यवस्तीपैकीं

‡ पूर्वी धर्मांचीं वसतिस्थानें दोन होतीं. एशिया खंडांतील पूर्वेकडील देश हें एक व पश्चिमेकडील देश हें दुसरें. पूर्वेकडे चीन तिबेटादि देशांत बुद्धधर्म, परशियांत पार्शीधर्म व हिंदुस्थानांत आर्यधर्म असे. पश्चिमेकडे यहुदी, खिस्ती व मुसलमानी धर्म असत. ह्या प्रत्येक दिशेकडील धर्मास पुढील व्याख्यानांत पूर्वेकडील व पश्चिमेकडील धर्मगण असें म्हटलें आहे. ह्या दोन्ही धर्मगणांचें गेल्या दीडशें वर्षांमागें फारसें दळणवळण व एकमेकांशीं संबंध नसे. हल्लीं तो संबंध व दळणवळण हिंदुस्थानांत दृष्टीस पडूं लागलें आहे.

860



अर्ध्याहून अधिक वस्ती ह्या एका क्षेत्रांत असे. ह्या क्षेत्रांत त्यावेळीं उपलब्ध असणाऱ्या धर्मपंथांचें उत्पत्तिस्थान हिंदुस्थान होय. भरतखंडाचा पश्चिमभाग हें तीन हजार वर्षांपासून दुसरें धर्मक्षेत्र बनून त्यांत दृष्टीस पडणाऱ्या सर्व धर्मपंथांचें मूळबीज प्यालस्टाईनमध्यें होतें. परमेश्वररूपेनें ह्या दोन्ही स्वतंत्र व अलग असणाऱ्या धर्मक्षेत्रांतील सर्व धर्म आतां एके ठिकाणीं नांदूं लागले आहेत, व त्यांचें एकमेकांवर जें कार्य घडत आहे त्याजवर सर्व जगताची धर्मोन्नति अवलंबून रहाणारी आहे. ह्या दोन्ही धर्मवर्गांमध्यें मुख्य भेद म्हटला म्हणजे असा आहे कीं, पश्चिमेकडील धर्मवर्गाची व्याप्ति संकोचित क्षेत्रावर, मर्यादित मनुष्यसंख्येवर व अल्पकाळपर्यंत असल्यामुळें एकच ईश्वरप्रणीत श्रुति, एकच मिशिहा, एकच अवतार व लोकांस एकच आश्रम व एकच हेतु सदर धर्मांत सांगितला गेला. पूर्वेकडील धर्मगणांत बहुत धर्मशास्त्रकर्ते, बहुत पैगंबर, बहुत अवतार, व बहुत श्रुति सांगितल्या.

कारण ह्या क्षेत्रांतील मनुष्यसंख्या फार, क्षेत्र मोठें व त्यांतील मनुष्यमात्राची हयातही मोठी. हाच दोन्ही धर्मवर्गांत मुख्य भेद आहे. हे दोन्ही धर्मवर्ग परमेश्वरानेंच उत्पन्न केले आहेत. त्यांचें स्वरूप व त्यांनीं व्यापिलेलीं क्षेत्रें मनांत आणिलीं असतां, त्यांत असा भेद असणें जरूर होतें. एका धर्मवर्गांत स्वरूपवैचित्र्य नव्हतें व दुसऱ्यांत एक हेतु नव्हता, अशा तत्त्वांवर त्यांत भेद काढणें प्रशस्त नाहीं. कारण ज्या धर्मपद्धतींचें माहेरघर हिंदुस्थान आहे, त्या धर्मपद्धतींनीं जें मोठें अवाढव्य क्षेत्र व्यापिलें आहे, त्यांतील त्यावेळच्या अनंत मुमुक्षुजनांची तहान, एका देशांतील एका कोनांत एका अपरिचित भाषेंत लिहिलेल्या श्रुतीनें कशी भागली असती ? अथवा एका जातींत जन्मलेल्या, एक भाषा बोलणाऱ्या, उल्लंघण्यास दुस्तर अशा समुद्र डोंगर नद्यादि व्यत्ययांमुळें दूरदेशीं रहाणाऱ्या पैगंबराची अगर साधूंची कास धरून त्यांचा तरणोपाय कसा व्हावा ? पश्चिमेकडील संकु

चित धर्मक्षेत्रांतही तीन धर्मपंथ उद्भवले, व त्यांतही आणखी पोट-भेद उत्पन्न झाले. मग पूर्वेकडील धर्मस्वरूपास फार वैचित्र्य आलें यांत नवल नाहीं. यहुदी धर्माचा पूर्ण विकास होण्यास पंधराशें वर्षें लागलीं. मुसलमानी धर्मशास्त्रकारांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांच्या धर्माची प्रसिद्धि होण्यास बावीसशें वर्षें लागलीं. आमच्या धर्माचा उदय होण्यास हजारोंच्या हजारों वर्षें लागलीं. तितकींच वर्षें आमच्या निरनिराळ्या श्रुति व धर्मसंस्थापना करणारे साधु यांचा उदय होण्यास लागलीं. जगाच्या अपेक्षा विचित्र, अगत्याच्या व शाश्वत आहेत; म्हणून मनुष्यमात्राच्या इतिहासांतील आणीबाणीच्या प्रसंगीं दुष्टांचे दमनार्थ व साधूंचे परित्राणार्थ युगायुगाचे ठिकाणीं, व देशोदेशीं परमेश्वर अवतार*

---

*यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥
परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।

—भगवद्गीता

शि. प्र. मंडळी म. म. द. वा.
860



घेत असतो, व अवतार धारण करण्या-पूर्वी धार्मिक लोकांस कृतकर्मांचा पश्चा-त्ताप होऊन त्यांनीं परमेश्वरचरणीं लीन व्हावें, म्हणून तो पुढें साधुसंतांस धाडितो, असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. हें खरें किंवा खोटें हें इतिहासांतर्गत जो पुरावा सांपडतो, त्यावरून ठरवावयाचें नाहीं. कारण सत्यासत्य निवडण्यास इति-हास हें साधन फारच अपुरतें आहे. इति-हासांतून प्राप्त होणारा ज्ञानप्रकाश जरी प्रथमतः उज्वल असला, तरी कालांतरानें तो मंद होतो. ईश्वरप्रणीत धर्माच्या सत्या-सत्यतेचें ज्ञान, इतर ज्ञानाप्रमाणें, न्याय, अनुमान, पुरावा वगैरे साधनांनीं सिद्ध करण्याचा कालांतरानें प्रसंग येऊं लागला म्हणजे, परमेश्वरानें प्रत्यक्ष प्रकट होऊन आम्हांवर कृपा करावी अशी, या पापमय जगतांत रहाणाऱ्या मनुष्यमात्रांच्या मनाची जी उत्कंठा तिचें समाधान कसें व्हावें ? ह्या विचित्र जडसृष्टीचें जें शक्ति-मान मूळ द्रव्य तेवढेंच उत्पन्न करून व त्यास सर्वगामी नियमांचे बंधनांत घालून

परमेश्वर अलिप्त राहिला असें नाहीं. ऽ त्या सृष्टीचे अल्पस्वल्प व्यापार व हालचाल यांतही त्याचा पावलोपावलीं हात आढळून येतो. प्रत्येक वाऱ्याच्या झुळुकेस तोच गति देतो. यःकश्चित् अंकुरांतही तोच प्राण घालतो. जडसृष्टीसंबंधानें तो जर इतका दक्ष आहे, तर मनुष्यमात्रांच्या आत्मिक नियमनासंबंधानें तो किती दक्ष व सहृदय असेल याची कल्पना करणें अवघड नाहीं. जो धर्मपंथ जगतास दृष्टिगोचरच झाला नाहीं, अथवा ज्याविषयीं त्यानें वार्ता देखील ऐकली नाहीं, तो धर्म मनुष्यानें स्वीकारिला नाहीं, म्हणून त्यास शासन‡ करण्याइतका क्रूर देव कसा होईल ? ह्या किंवा दुसऱ्या युगांत,

---

ऽ अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधं ।।
—गीता

‡ ख्रिस्तीधर्मांत जो ख्रिस्तावर भाव ठेवणार नाहीं त्यास अनंत नरकवास घडेल असें सांगितलें आहे. म्याथू. २५ पहा.

ह्या किंवा दुसऱ्या देशांत मुमुक्षुजनांचे मुक्तीसाठीं योजिलेले धर्मपंथ ज्यांनीं ऐकिले देखील नाहींत असे अनंत प्राणी युगायुगाचे ठिकाणीं मरण पावले आहेत. अशा प्राण्यांच्या ह्या चुकीकरितां अथवा अज्ञानाकरितां तो त्यास शासन करील असें कधींही होणार नाहीं. ह्याचकरितां त्यानें आपल्या धर्माज्ञा मनुष्यमात्रांचे हृत्पटावर लिहून ठेविल्या आहेत व निरनिराळ्या देशांत, निरनिराळ्या काळीं कमीज्यास्त स्पष्ट अशा श्रुति साधुसंतांचे हातून लि न त्या वाचण्यापुरतें ज्ञान त्यानें आपणांस दिलें आहे, व मला भिऊन निर्मल अंतःकरणानें जो माझ्या श्रुतींस पूज्य मानील त्याजवर माझी कृपा होईल असें त्यानें अभिवचनही दिलें आहे.

वर जे पूर्व व पश्चिमेकडील धर्मवर्ग सांगितले, त्यांत इतिहासदृष्ट्या जो भेद आढळतो, तो निवेदन केला. आतां त्यांत स्वभावसिद्ध असणारा भेद सांगितला पाहिजे. या दोन धर्मगणांचीं जीं पुढें भ्रष्टस्वरूपें दृष्टोत्पत्तीस आलीं व त्यांत

व्यवहारदृष्ट्या जो अनाचार मातला, त्यावरून त्या धर्माचे मूळ स्वरूपाचा विचार करणें रास्त नाहीं. एका धर्मवर्गांतून मूर्तिपूजा व जातिभेद उत्पन्न झाला व ह्या अनाचारास अनुसरून दुर्बळ विचारांची व अनीतीची प्रवृत्ति झाली. जादूटोणा, शकून वगैरेवर विश्वास बसला. संस्कार, बाह्य शरीरशुद्धि व प्रायश्चित्तें यांची महती वाढली, व लहानपणां लग्नें करण्याची व बालविधवांच्या जन्माचें मातेरें करण्याची भयंकर वहिवाट पडली. दुसऱ्या म्हणजे पश्चिमेकडील धर्माचाही योग्य मर्यादेचें उल्लंघन होऊन दुरुपयोग झाला नाहीं असें नाहीं. त्या धर्मांत पोप, ख्यापक साधु व मेरी यांची पूजा; मृत साधूंच्या शवादिजिनसांचे अद्भुत चमत्कार, धर्मयुद्धें, धर्मच्छल, धर्मसमीक्षण सभा, हजारोंच्या हजारों पाखांडमतवादी व चेटकी हे भूतपिशाच्चयांचे अनुयायी आहेत, असें समजून त्यांस जाळून फस्त करणें व कोट्यावधि प्राण्यांस अनंत नरकवास ठरविणें, असे अनेक अनाचार दृष्टीस पडतात.

सर्व देशांतील व सर्व युगांतील मननशील लोकांस या अघटित अनाचारांचा तिटकाराच आला आहे; म्हणून ह्या दुःखद मानवी दुष्कृतीनें दूषित झालेल्या मनानें धर्माविषयीं विचार करितां कामा नये. आकाशांतून निर्मळ उदकाच्या धारा पृथ्वीवर पडतात व त्यापासून गढूळ पाण्यानें भरलेले प्रवाह, दलदली व पाणथली उत्पन्न होतात. त्याच न्यायानें देहरूप मृत्तिकापात्रांत सत्य हें सांठवून ठेविल्यानें भ्रष्ट होतें. ह्या अशा प्रकारच्या अनाचारांचा उन्नत मनास सदैव तिटकाराच येतो, व वेळोवेळीं साधुसंतही ह्या जगतांत प्रकट होऊन, ह्या अनाचारांचा निषेध करीत असतात. धर्मच्छल व धर्मपिसें यांजबद्दल जसा ख्रिस्ती आणि मुसलमान या लोकांस दोष देणें वाजवी नाहीं, त्याचप्रमाणें जातिभेदाचा अन्याय व आपल्या स्त्रियांची फार दिवसांपासून होत असणारी हेळणा, यांजबद्दल आपल्या पूर्वजांस दोष देणें गैर आहे. हा अनाचार मनांत आणून धर्माचा विचार न करितां त्याचें

खरें रहस्यच ताडिलें पाहिजे. मनुष्याचा परमेश्वरापाशीं प्रत्यक्ष सेव्यसेवकभाव आहे हें पूर्वेकडील धर्माचें प्रधानतत्त्व होय. परमेश्वर हा मनुष्यमात्रांचे दृष्टीस पडतो, त्याची वाणी ऐकूं येऊन ती त्यांचे हृदयांत बाणते, त्याशीं आपणांस प्रत्यक्ष बोलतां येतें असें आमचे वेद व आमचीं पुराणें आम्हांस सांगत आलीं आहेत. परमेश्वर हा आपला *मातापिता, मार्ग-

---

*मायेवरी सत्ता आवडीची बाळा।
संकोचोनि लळा प्रतिपाळी।
अपराध माझे न मानावे मनीं।
तुम्ही संतजनीं मायबापीं।

—तुकाराम

बाप माझा दिनानाथ।
वाट भक्ताची पाहात

—कित्ता

मायबापापुढें लाडिकें लेंकरूं।
तैसें बोल करूं कवतुकें।
कृपावंता घाली प्रेमपान्हारस।
वोळवी वोरस पांडुरंगा।

—कित्ता.

के. म. म. ह. भा. वोलवाल,
ग्रंथ संग्रह

दर्शक, साह्यकर्ता आहे. अशा रूपानें त्यास ओळखावें, असें आम्हांस शिकविलें गेलें आहे; परंतु तो तसाच पवित्र शास्ता, न्याय व राजकर्ता स्वामी आहे, असें मात्र आम्ही त्यास फारसें ओळखिलें नाहीं. म्हणून राजकारस्थानासंबंधानें बंधनांस योग्य मान देणें, व कायदाकानूंस व लोकव्यवस्थेस पूज्य मानणें, हा आमचा फारसा जन्मस्वभाव नाहीं. भ्रष्टाचारापासून मुक्त झालेल्या ख्रिस्ती धर्मास योग्य वळण देण्याचें काम यहुदी व विशेषेंकरून रोमन आणि ग्रीक या लोकांनीं चांगलें बजाविलें. न्याय व धर्मशास्त्र यांचें महत्त्व ते उत्तम रीतीनें मानीत असत व म्हणूनच पाप हा साधारण प्रमाद नसून महत् अपराध आहे, व त्याजबद्दल तसेंच प्रखर शासन झालें पाहिजे, हें मत ख्रिस्ती धर्मांत दृढतर होत गेलें. परमेश्वर आपणांवर इहलोकींचें प्रत्यक्ष राज्य करीत आहे, असें यहुदी लोक मानीत असत. मोजेसनें त्यांस धर्मशास्त्रबंधनें घालून दिलीं. ते लोक न्यायाधिशांस व राजांस

आपले साधु समजत, व मशीहा हा आपला राजाच होईल अशी त्यांची खात्री आहे. ख्रिस्तास इहलोकींची राज्यसत्ता नव्हती, म्हणूनच त्यांनीं त्याचा स्वीकार केला नाहीं. ख्रिस्ती लोक देखील मुक्ति म्हणजे परमेश्वराच्या स्वर्गीचे राज्यांत वास करणें असें मानितात. आमच्या-संबंधानें विचार करतां धर्मशास्त्र आणि न्यायकर्ता, अपराध आणि त्याचें शासन, आज्ञाभंगाचें पाप व त्याचें प्रायश्चित्त ह्या कल्पना आमच्यांत गौण मानल्या आहेत. आम्हांस आईचा लोभ, बहिणीची ममता, बंधुनिष्ठा, बापाचें प्रेम, धन्याचा वत्सल-पणा, व जे कुटुंबिय सद्गुण आणि धर्म एकमेकानें एकमेकांविषयीं सहिष्णु व क्षमाशील असावें असें सांगतात, अशा वृत्ति व असे धर्म आम्ही शिकत आलों आहोंत, व आमच्या श्रुति, स्मृति व आमचे साधुसंत याच वृत्तींच्या आधारें आम्हांस उपदेश करीत आले आहेत. हेंच राजा रामचंद्राच्या कथेचें खरें मर्म होय, व आज शेंकडों वर्षे जीं आमच्या स्त्रीपुरु-

षांचीं मनें कृष्णलीलेचे ठिकाणीं अंकित होऊन राहिलीं आहेत, याचेंही रहस्य हेंच होय.

पश्चिमेकडील धर्मांत अत्यंत मंगल जो परमेश्वर व अत्यंत पापी जो मनुष्य, त्या दोहोंमध्यें अपार भेद गणला आहे व म्हणूनच त्या धर्मांत परमेश्वर आणि मनुष्य यांजमध्यें सख्य करून देण्यासारख्या अन्य मध्यस्थांची योजना झाली आहे. उधळपट्टीनें भिकेस लागलेल्या आपल्या पुत्रास* पिता आपण होऊन शोधून काढून व त्यास झालेल्या पश्चात्तापानें द्रवून, त्या कंगाल पुत्रास, कोणाच्याही मध्यस्थीवांचून, लोभानें फिरून घरांत घेतो, ह्या सुंदर रूपकाच्या तात्पर्याप्रमाणेंच पूर्वेकडील धर्मांचें खरें तात्पर्य होय. कुटुंबाच्या माणसांतील अन्योन्यसंबंधजन्य ज्या सद्गुणांची प्रशंसा आम्हीं करितों तेही सद्गुण पश्चिमेकडील

*हें उधळ्या पुत्राचें रूपक- नवा करार ल्युका, अ. १५ त सविस्तर दिलें आहे.

लोकांत पूर्णपणें आढळून येत नाहींत असें नाहीं. त्यांचें ह्या सद्गुणांवर जें प्रेम आहे त्याचें, मध्ययुगांत विद्यमान असणारी मेरीची उपासना, हें फल होय; व या सद्गुणप्रेमाचे पोटीं बेथलेहेम येथें झालेल्या ख्रिस्तजन्मकथेच्या करुणरसाचा उद्भव होय. आमच्यांतही इहलोकराजसत्ता दैविक× मानिली आहे. शिवाय वर जो दोन्ही धर्मगणांत भेद सांगितला, तो प्रथमदर्शनीं जसा आपणांस मोठा आहेसा वाटतो, तसा सूक्ष्म विचारांतीं मोठा नाहीं. प्रत्येक व्यक्तीस मोक्षाची जोड होण्यास व प्रत्येक मनुष्याचे अंतःकरणास सुखकर्ता असा कोणी तरी तिऱ्हाईत, परमेश्वराच्या दयेनें निर्माण झाला पाहिजे; तसेंच मनुष्यमात्रांच्या आज्ञाभंगापासून, व अपराधापासून त्यांस जडलेल्या पापाचे क्षालनार्थ ख्रिस्तानें वधस्तंभीं आपला देह अर्पण केल्यानें त्यास पावन करण्यासारिखा परमेश्वर दयावान आहे, व ही

---

× नराणांच नराधिपम्। —गीता.

परमेश्वरदया खरोखर पित्याचीच जोड असून. तिचा ख्रिस्तावर भाव ठेविल्यानें मनुष्यास लाभ होतो, हीं ख्रिस्तीधर्माचीं तत्त्वें आहेत. जरी आम्हांस वाट दाखविण्यास आमचे गुरु आहेत, तरी हीच परमेश्वराची कृपा आम्ही प्रत्यक्षरीतीनें संपादन करण्यास झटतों. ह्याच कृपेच्या जोडीकरितां आमच्या ऋषींनीं परिश्रम केले, तपश्चर्या केल्या व अंतीं हे त्यांचे सर्व श्रम निष्फळ झाले. आमच्या भिक्षुकांनीं होमहवनें केलीं, तरी त्यांस इष्टफळ प्राप्त झालें नाहीं. आमच्या यात्रेकरूंनीं लांबलांबच्या यात्रा करून देह कष्टविले; परंतु त्याही व्यर्थ गेल्या. शेवटीं आमच्या साधुसंतांनीं ह्या सर्व मार्गांचा त्याग करून व परमेश्वरावर सर्वस्वीं भार घालून त्याजजवळ दयाभाक मागितली व त्यांस ती मिळाली. ख्रिस्तीधर्मांत प्रतिपादन केलेले सद्धर्म, ह्या लोकयात्रेंत मनुष्याच्या शक्तीबाहेर व त्यास सहज न होण्यासारखा त्याजवर भार घालतात, व अखेर तिसऱ्यासच बळी देऊन तो भार त्याच्या डोईवरून

खालीं उतरतात हें खरें आहे; तरी त्या सद्धर्मभंगाच्या उग्र परिणामांमुळें ते पाळणें अत्यंत अगत्याचें आहे, असें मनाला वाटतें. आमच्या धर्मांत ह्या सद्धर्माचें स्वरूप सौम्य असल्यामुळें सद्धर्मरक्षण जितकें अगत्याचें वाटावें तितकें वाटत नाहीं. परंतु पितामाता हे आपल्या मुलांस एका आयुष्यांतील दुष्कृत्यांबद्दल अनंत नरकवासासारखें घोर शासन योजिणार नाहींत, ह्या तत्वानें व आमच्या धर्मांत अस्तित्वाच्या पायऱ्या* योजून, त्या चढून गेल्यानें, अंतीं मनुष्य परमेश्वराच्या पूर्ण कृपेस पात्र होईल असें सांगितल्यामुळें वरील दोषास बरेंच विरजण पडलें आहे. दोन्ही धर्मगणांची जशी एकच तत्त्वापासून प्रथम उत्पत्ति झाली, तशीच ईश्वराची कृपा संपादन करणें, हेंच निदानचें तत्त्व ठरून, त्यांची एकवाक्यता

---

*अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परांगतिम् !

—भगवद्गीता

झाली आहे. त्यांजमध्यें जे फरक दृष्टीस पडतात ते त्यांच्या निरनिराळ्या अवस्थेमुळें, इतिहासामुळें व मनुष्यमात्राच्या पंगु स्वभावामुळें उद्भवले आहेत. परंतु देवाची कृपा हेंच मुक्तीचें साधन, हें प्रधानतत्त्व दोहोंत असून, तेंच दोन्ही धर्मगणांचे आधारस्तंभ आहेत.

आतां एका धर्मगणांत जें दौर्बल्य आढळतें त्यास दुसऱ्या धर्मगणाच्या बलाचा आपणांस आधार दिला पाहिजे. त्यांतील श्रुतींचें आपण अवलोकन केलें पाहिजे. त्या धर्माच्या संस्थापकांचा अथवा पैगंबरांचा स्वीकार केला पाहिजे आणि ख्रिस्त हा जरी मनुष्यपुत्र आहे, तरी त्यास देवपुत्र आहे असें मानून आपण त्यास पूज्य मानिलें पाहिजे. अशा प्रकारें आपण दाखविलेल्या औदार्याचें परधर्मी लोक अनुकरण करणार नाहींत हें खरें, तत्रापि ज्या आपल्या समानवृत्तीचा जगतांत डंका वाजला आहे, ती धारण करून, प्रल्हाद आणि ध्रुव, व्यास आणि नारद, चैतन्य आणि नानक, बुद्ध आणि

कानफ्यूशिअस,महंमद आणि झोरोआस्टर, रामदास आणि तुकाराम, एकनाथ आणि नामदेव अशा ह्या जगतांत निर्माण झालेल्या साधुसंतांची जी दिव्यमाला समारंभानें परमेश्वरसिंहासनाजवळ जात आहे, व आजपर्यंत एकमेकांपासून पराङ्मुख झालेले अशा लक्षावधि मनुष्यप्राण्यांचा पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत व उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत दृढ स्नेह घडवून आणून व त्यांजकरवीं एकमेकांस आलिंगनें देववून त्यांस आपल्या मागोमाग त्याच परमेश्वरचरणापाशीं नेत आहे, त्या साधुसंतांचे अग्रभागीं चालणाऱ्या ख्रिस्तास आपण मान दिला पाहिजे. हल्लीं यमुना आणि गंगा यांच्या कृष्ण आणि धवल उदकांचा संगम होऊन एकवट झालेला जलौघ सागरास जाऊन मिळत आहे. ख्रिस्तचरित्रासारख्या सिद्ध गोष्टींचा तुम्ही कसा विचार करणार, असा डॉ. पेन्टीकास्ट यांनीं आपणांस एक प्रश्न केला होता, त्याचें मी अशा रीतीनें उत्तर देतों. सर्व धर्मांची अशी एकवाक्यता करणें हें महत्कार्य

करण्याचा अधिकार आर्य लोकांत श्रेष्ठ जे आम्हीं, त्या आमचा आहे. हें कर्तव्य आमच्या अस्तित्वाचा प्रधानहेतु होय व परमेश्वरावर भाव ठेवणें आणि मनुष्य-मात्रावर प्रेम करणें हें आमचें आदि-कर्तव्य होय. ह्याचकरितां परमेश्वरानें आम्हांस अनंत संकटांत घालून व आमच्या मागें दुःसह कष्ट लावून आम्हांस कसोटीस लावलें आहे. एक-मेकांच्या मदतीनें आपण आपलें कल्याण करून घ्यावें, दुसऱ्याचे दोष पोटांत घालावे; एकमेकांस लागेल तेथें मदत करावी व सर्वांचा एक पिता जो परमेश्वर त्याच्या चरणीं लीन होऊन त्याची उपासना व प्रार्थना करावी, अशी परमेश्वर आम्हांस बुद्धि देवो. पूर्व आणि पश्चिम यांची फाटाफूट होऊन त्यांच्यांत असें कांहीं अपार अन्तर उत्पन्न झालें आहे कीं, तें मनुष्यास मोजतां अगर मापितां येणार नाहीं असा डॉक्टर पेन्टी-कास्ट यानीं काल उद्गार काढिला होता. भूगोलदृष्ट्या हें म्हणणें अगदीं यथार्थ

आहे खरें; परंतु अवान्तर दृष्टीनें पहातां पूर्व आणि पश्चिम या दोन्ही ठिकाणचे लोक एका गृहांत एकत्र जमून ज्या परमेश्वरप्रेमाचें सर्वांवर सारखें छत्र आहे, त्या खालीं, स्नेहभावानें सर्व मिळून परमेश्वराची सेवा करूं शकतात, असें आज येथें जमलेल्या समाजावरून स्पष्ट दिसत आहे व असेंच पुढेंही घडून येणार अशी आमची केवळ आशा आहे; इतकेंच नाहीं, तर असा आमचा दृढभावही आहे. जगांतील सर्व धर्मपंथ ईश्वरप्रणीत असून प्रत्येक देशांत प्रकट झालेले पैगंबर हे त्याचे दयाळू स्वभावाचे सर्वत्रांस ज्ञान करून देणारे उपदेशक होत. सर्व ईश्वरप्रणीत धर्म त्याच्या चालकत्वाचे व दक्षतेचे दर्शक होत. परमेश्वराच्या मुख्य आज्ञा आमच्या हृदयपटावर रेखून ठेविल्या आहेत आणि आजपर्यंत मनुष्यमात्रास जी पूर्णावस्था प्राप्त झाली नाहीं त्या नानाविध पूर्णावस्थेची तो दूरदृष्टीनें घटना करीत आहे. ह्या महत्कार्यांत पूर्वेनें व पश्चिमेनें जीं जीं कामें

म/८७९८

करावयाचीं तीं तीं ठरवून तीं त्यांचे माथीं सोंपविलीं आहेत आणि ज्या वेळेस हें महत्कार्य सिद्धीस जाईल त्यावेळेस परमेश्वराचे सिंहासनाकडे जाणारे आडमार्ग नष्ट होऊन एकच हमरस्ता पडेल आणि या जगांतील नानाविध जातींच्या लोकांवर परमेश्वराची एकसत्ता चालू होईल.

मंडळी म. म. द. मा. पोतदार ग्रंथसंग्रह
शि. प्र. मंडळी म. म. द. वा. पोतदार ग्रंथसंग्रह
860

[ ज्ञानप्रकाश प्रेस, पुणें ४. ]